**अतित्वर्य/महत्वाचे**
**आजचे आज वाटणे**

**पुणे महानगरपालिका**
**स्थायी समिती**
**तहकूब सभा परिपत्र**

स्थायी समितीची तहकूब झालेली सभा (**मंगळवार दि. ६/१२/२०१६** रोजी तहकूब केलेली सभा) **बुधवार दि.७/१२/२०१६ रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा)** वाजता महात्मा जोतिबा फुले सभागृहात (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत **कार्यपत्रिका क्र. ३७ दि. ६/१२/२०१६ वरील विषय क्र. १८०५ ते १८२५ चा तसेच खालील दाखल विषय क्र. १८२६ त्वर्य ते १८५३ त्वर्य** चा विचार होईल.

## मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. १८२६ त्वर्य**

मा.आबा बागुल यांचे दि.२/१२/२०१६ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेने एस.आर.ए.,एस.आर.डी.,लँड ॲक्वीजीशन इत्यादी कारणासाठी टी.डी.आर. स्वरूपात मोबदला देण्यात आलेला आहे. टी.डी.आर. हा व्यापारात तथा व्यवहारात आर्थिक स्वरूपात (रूपयात मोबदला) गणला जातो. या कारणासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६ अन्वये. दिलेल्या टी.डी.आर. चे लेखा परिक्षण पुणे महानगरपालिकेच्या मुख्य लेखा परिक्षक यांच्याकडून १५ मे १९९७ पासुन ३० नोव्हबर २०१६ पर्यंतचे लेखा परिक्षण अहवाल मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्यसभेसमोर सादर करावा.

मुख्य लेखा परिक्षक यांनी डिसेंबर २०१६ पासुन एस.आर.ए.,एस.आर.डी.,लॅन्ड ॲक्वीजीशन इत्यादी साठी देण्यात येणाऱ्या टी.डी.आर. चे लेखा परिक्षण करून दर महिन्याला मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेला अहवाल सादर करावा.

**विषय क्र. १८२७ त्वर्य**

मा.सौ.विजया वाडकर यांचे दि.३/१२/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र.४५ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु. २ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक, सार्वजनिक वाहतूक सुधारणा व विशेष प्रकल्प विभागामार्फत करावयाची कामे,पान क्र.१/२,अनु.क्र.१०, हांडेवाडी(ससाणेनगर)येथे रेल्वे उड्डाणपूल बांधणे. | २ कोटी | --- |
| **नवीन सुचविलेली कामे –** | | |
| १)प्रभाग क्र.४५ब मध्ये विविध विकासाची कामे करणे. | --- | ४० लाख |
| २) प्रभाग क्र.४५ब मध्ये महंमदवाडी परिसरात प्रकाश व्यवस्था करणे. | --- | १० लाख |
| ३) प्रभाग क्र.४५ब मध्ये ड्रेनेज विषयक कामे करणे. | --- | १० लाख |
| ४) प्रभाग क्र.४५ब मध्ये काळे पडळ परिसरातविविध विकास कामे करणे. | --- | १० लाख |
| ५) प्रभाग क्र.४५ब मध्ये दुगडचाळ येथे भूमिगत केबल टाकणे. | --- | १० लाख |
| ६) प्रभाग क्र.४५ब मध्ये कृष्णानगर येथे गल्लीनंबर १ मध्ये रस्ता कॉक्रीटीकरण करणे व ब्लॉक बसविणे. | --- | १० लाख |
| ७) प्रभाग क्र.४५ब मध्ये कृष्णानगर येथे गल्लीनंबर २ मध्ये रस्ता कॉक्रीटीकरण करणे व ब्लॉक बसविणे. | --- | १० लाख |
| ८) प्रभाग क्र.४५ब मध्ये कृष्णानगर येथे गल्लीनंबर ३ मध्ये रस्ता कॉक्रीटीकरण करणे व ब्लॉक बसविणे. | --- | १० लाख |
| ९) प्रभाग क्र.४५ब मध्ये कृष्णानगर येथे गल्लीनंबर ४ मध्ये रस्ता कॉक्रीटीकरण करणे व ब्लॉक बसविणे. | --- | १० लाख |
| १०) प्रभाग क्र.४५ब मध्ये कृष्णानगर येथे गल्लीनंबर ५ मध्ये रस्ता कॉक्रीटीकरण करणे व ब्लॉक बसविणे. | --- | १० लाख |
| ११) प्रभाग क्र.४५ब मध्ये कृष्णानगर येथे गल्लीनंबर ६ मध्ये रस्ता कॉक्रीटीकरण करणे व ब्लॉक बसविणे | --- | १० लाख |
| १२) प्रभाग क्र.४५ब मध्ये कृष्णानगर येथे गल्लीनंबर ७ मध्ये रस्ता कॉक्रीटीकरण करणे व ब्लॉक बसविणे. | --- | १० लाख |
| १३) प्रभाग क्र.४५ब मध्ये कृष्णानगर येथे गल्लीनंबर ८ मध्ये रस्ता कॉक्रीटीकरण करणे व ब्लॉक बसविणे. | --- | १० लाख |
| १४) प्रभाग क्र.४५ब मध्ये कृष्णानगर येथे गल्लीनंबर ९ मध्ये रस्ता कॉक्रीटीकरण करणे व ब्लॉक बसविणे. | --- | १० लाख |
| १५) प्रभाग क्र.४५ब मध्ये विविध ठिकाणी भूमिगत केबल टाकणे. | --- | १० लाख |
| १६) प्रभाग क्र.४५ब मध्ये काळेपडळ परिसरात ड्रेनेज विषयक कामे करणे. | --- | १० लाख |
| १७) प्रभाग क्र.४५ब मध्ये काळेपडळ परिसरात प्रकाश व्यवस्था करणे. | --- | १० लाख |

( मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी .)

**विषय क्र. १८२८ त्वर्य**

मा.अप्पा रेणुसे व मा.विशाल तांबे यांचे दि.३/१२/२०१६ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या वतीने शहरात अनेक ठिकाणी ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र उभी करण्यात आली आहेत. ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र हा स्तुत्य उपक्रम असून ही काळाची गरज आहे. या ज्येष्ठ नागरिकांना सुख दु:खाचे क्षण एकत्र घालविण्यासाठी या विरंगुळा केंद्रांचा उपयोग होतो.

पुणे मनपाच्या अखत्यारीतील ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र ही नोंदणीकृत ज्येष्ठ नागरिक संघास सवलतीच्या दरात भाडे तत्वावर देण्यात यावी.

**विषय क्र. १८२९ त्वर्य**

मा.अनिल राणे यांचे दि.५/१२/२०१६ चे पत्र.

सन २०१६-१७ मधील अंदाजपत्रकामध्ये मनपा मुख्य सभा ठराव क्र. ४०४ दि. १०/८/२०१६ नुसार प्रभाग क्र. ३६ अ मध्ये र.रुपये १५ लाखाचे वर्गीकरणास मान्यता देण्यात आलेली असून सदर रकमेतून खालील कामे करणेसाठी र.रुपये १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक, मनपा मुख्य सभा ठराव क्र. ४०४ दि. १०/८/२०१६ | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. ३६ मध्ये म्हात्रे पुल येथे ड्रेनेज विभागामार्फत चालू असलेल्या सिमाभिंतीचे अपूर्ण काम व विविध विकासाची कामे करणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १८३० त्वर्य**

मा.श्रीमती पुष्पा कनोजिया यांचे दि.५/१२/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र. २९ मध्ये बावधन येथील मराठा मंदिराच्या मागील बाजूस असलेला त्रिमुर्ती चौकापासून जाणारा रस्त्याच्या दोन्ही बाजूस कलम २१० अन्वये रस्ता रुंदी करण्यात यावी.

**विषय क्र. १८३१ त्वर्य**

मा.सौ.नंदा लोणकर यांचे दि.५/१२/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र. ४१ (ब) मध्ये प्लेझंट पार्क येथील परिसरातील पादचा-यांच्या सोयीकरिता सोलापूर रस्त्यावर पादचारी पूल उभारणे करिता रक्कम रुपये ५०,००,०००/- चे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी र. रू. | अधिक र. रू. |
|---|---|---|
| सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक<br>पान क्र. २३७ वरिल यादी क्र. जे २६<br>शहरामध्ये स्मारके उभारणे.<br>बजेट कोड CE28A226/J26<br>अ. क्र. ६- CE28A196+<br>कोथरुड येथे शिवसृष्टी उभारणे. | ५०,००,०००/- | ----- |
| नवीन सुचविलेले काम<br>सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रक, प्रभाग क्र. ४१ (ब) मधील प्लेझंट पार्क येथील परिसरातील पादचा-यांच्या सोयीकरिता सोलापूर रस्त्यावर पादचारी पूल उभारणे. | ----- | ५०,००,०००/- |

**विषय क्र. १८३२ त्वर्य**

मा.सौ.नंदा लोणकर यांचे दि.५/१२/२०१६ चे पत्र.

SRPF वानवडी येथे क्रीडासंकुल बांधणेकरिता रक्कम रुपये ५०,००,०००/- चे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी र. रू. | अधिक र. रू. |
|---|---|---|
| सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक<br>पान क्र. २३७ वरिल यादी क्र. जे २६<br>शहरामध्ये स्मारके उभारणे.<br>बजेट कोड CE28A226/J26<br>अ.क्र. ६- CE28A196+<br>कोथरुड येथे शिवसृष्टी उभारणे. | ५०,००,०००/- | ----- |
| नवीन सुचविलेले काम<br>सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रक, SRPF वानवडी येथे क्रीडासंकुल बांधणे | ----- | ५०,००,०००/- |

**विषय क्र. १८३३ त्वर्य**

मा.गणेश बिडकर यांचे दि.६/१२/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र. ३९ ब मधील नागरिकांची संसर्गजन्य आणि असंसर्गजन्य यांची जनजागृती आणि त्यांची वैद्यकिय तपासणी व नवीन लॅब टेस्ट करणेसाठी र.रुपये १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| **अ.क्र.** | **अर्थशिर्षक** | **कमी** | **अधिक** |
|---|---|---|---|
| १ | सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक,बजेट कोड RE22A113/SR14-31 पान क्र. १६४, अ.क्र. ३१, प्रभाग क्र. ३९ ब नाना पेठ मटण मार्केट लगत असलेल्या आरोग्य कोठीवरील समाज मंदिरास रंगरंगोटी करणे, फर्निचर करणे व तद्नुषंगिक कामे करणे. | १० लाख | --- |
| | **नवीन सुचविलेले कामे** | | |
| १ | प्रभाग क्र. ३९ ब मधील नागरिकांची संसर्गजन्य आणि असंसर्गजन्य यांची जनजागृती आणि त्यांची वैद्यकिय तपासणी व नवीन लॅब टेस्ट करणे. | --- | १० लाख |

**विषय क्र. १८३४ त्वर्य**

मा.गणेश बिडकर यांचे दि.६/१२/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र. ३९ अ मध्ये रास्ता पेठ, सोमवार पेठ, गणेश पेठ परिसरात गल्लीबोळात ड्रेनेज लाईन टाकणे व तद्नुषंगिक कामे करणेसाठी र.रुपये १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| **अ.क्र.** | **अर्थशिर्षक** | **कमी** | **अधिक** |
|---|---|---|---|
| १ | सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक, बजेट कोड ZE16A104/ST2-162 प्रभाग क्र. ३९ अ नाना पेठ ३११ ते ३२३ रास्ता पेठ पाण्याची लाईन टाकणे. | १० लाख | --- |
| | **नवीन सुचविलेले कामे** | | |
| १ | प्रभाग क्र. ३९ अ मध्ये रास्ता पेठ, सोमवार पेठ, गणेश पेठ परिसरात गल्लीबोळात ड्रेनेज लाईन टाकणे व तद्नुषंगिक कामे करणे. | --- | १० लाख |

**विषय क्र. १८३५ त्वर्य**

मा.सचिन दोडके यांचे दि.६/१२/२०१६ चे पत्र.

**प्रभाग क्र.३०ब मध्ये लॉन टेनिस चे ग्राउंड बांधणे**साठी र.रुपये ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-१७ अंदाजपत्रक, **प्रभाग क्र.३०ब मध्ये नाट्य गृह बंधणे पान क्र.२३६ सी.ई.२८ए१६० / एस जे १६-१३** | ५० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>**प्रभाग क्र.३०ब मध्ये लॉन टेनिस चे ग्राउंड बांधणे** | --- | ५० लाख |

विषय क्र. १८३६ त्वर्य

मा.सचिन दोडके व मा.सौ.मुक्ता टिळक यांचे दि.६/१२/२०१६ चे पत्र.

"२३. सभागृह नेता चहापान खर्च RE11A123" या अर्थाशिर्षकावरची तरतूद संपुष्टात आलेली आहे. तरी या अर्थाशिर्षकावर र.रु.६०,०००/- इतकी तरतूद उपलब्ध करून द्यावी.

विषय क्र. १८३७ त्वर्य

मा.फारुक इनामदार व मा.सौ.अश्विनी कदम यांचे दि.६/१२/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र. ४१ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. १ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थाशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-१७ अंदाजपत्रक, स्वारगेट चौकात उड्डाणपूल बांधणे FE61A118/A-136 | १ कोटी | --- |
| **सुचविलेली कामे** | | |
| १) प्रभाग क्र.४१ब मधील प्लेझेंत पार्क परिसरातील पादचाऱ्यांसाठी सोयीकरिता सोलापूर रस्त्यावर पादचारी पूल उभारणे | ---- | ५० लक्ष |
| २) एस.आर.पी.एफ. वानवडी येथे क्रीडा संकुलन बांधणे. | ---- | ५० लक्ष |

विषय क्र. १८३८ त्वर्य

मा.सौ.अश्विनी कदम व मा.राजु पवार यांचे दि.६/१२/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र. ६७ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. १.६४ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक, २. प्राथमिक शिक्षण, पान क्र. ९४, अ.क्र. १३, प्राथमिक शाळेसाठी नविन इमारत बांधणे, (यादी क्र.एसजे २), पान क्र. २१९, अ.क्र. ३, प्रभाग क्र.६७ ब ई लर्निंग स्कुल व सैनिकी स्कुल क्रिडा निकेतनासह उभारणे | १.६४ कोटी | --- |
| नविन सुचविलेली कामे | | |
| १) प्रभाग क्र. ६७ ब येथील वि.स.खांडेकर शाळेमध्ये विविध विकास कामे करणे | --- | ७० लाख |
| २) प्रभाग क्र. ६७ ब येथील वि.स.खांडेकर शाळेमधील नागरवस्ती विभागात लिफ्ट बसविणे | --- | ३५ लाख |
| ३) प्रभाग क्र. ६७ ब येथील वि.स.खांडेकर शाळेमध्ये विद्युत विषयक कामे करणे | --- | ४४ लाख |
| ४) प्रभाग क्र. ६७ ब येथील वि.स.खांडेकर शाळेमध्ये विद्युतीकरणाची कामे करणे | --- | १५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

विषय क्र. १८३९ त्वर्य

मा.सौ.अश्विनी कदम, मा.राजु पवार व मा.अविनाश बागवे यांचे दि.६/१२/२०१६ चे पत्र.

माता रमाई स्वावलंबन योजनेअंतर्गत सर्व स्तरातील विधवा, परितक्त्या, निराधार महिलांना दरमहा र.रुपये १,०००/- आर्थिक सहाय्य करणेसाठी र.रू. २ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक, शहरामध्ये स्मारके उभारणे, (यादी एसजे २६), पान क्र. २३७, अ.क्र.४, सावित्रीबाई फुले स्मारक (भिडे वाडा) | २ कोटी | --- |
| नविन सुचविलेले काम<br>माता रमाई स्वावलंबन योजनेअंतर्गत सर्व स्तरातील विधवा, परितयक्त्या, निराधार महिलांना दरमहा र.रुपये १,०००/- आर्थिक सहाय्य करणे | --- | २ कोटी |

माता रमाई स्वावलंबन योजना (मागासवर्गीयांसाठी) मा.मुख्य सभेने मान्यता दिल्याच्या दिनांकापासून सदर योजनेचा लाभ द्यावा.

**विषय क्र. १८४० त्वर्य**

मा.सौ.अश्विनी कदम व मा.सौ.मुक्ता टिळक यांचे दि.६/१२/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र. ६५ ब मध्ये खालील विविध विकासाची कामे करणेसाठी र.रू. ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक, शहरामध्ये स्मारके उभारणे, **(यादी एसजे २६)**, पान क्र. २३७, अ.क्र.३, महात्मा फुले वाडयाचे सुशोभिकरण व परिसरातील विविध विकास कामे करणे | ५० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे<br>१)प्रभाग क्र. ६५ ब मधील घोरपडे पेठ उद्यानात कारंज्याची उर्वरित कामे करणे<br>२) प्रभाग क्र. ६५ ब मधील महात्मा गांधी मनपा शाळेमध्ये उर्वरित बांधकाम पूर्ण करणे | ---<br>--- | २५ लाख<br>२५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १८४१ त्वर्य**

मा.अविनाश बागवे, मा.सौ.मुक्ता टिळक, मा.सौ.आरती बाबर, मा.सौ.दिपाली ओसवाल, मा.फारुक इनामदार, मा.सौ.सुनिता गलांडे व मा.सौ.अश्विनी कदम यांचे दि.६/१२/२०१६ चे पत्र.

उरुळी देवाची फुरसुंगी येथील कचरा बंदिस्त करण्यासाठी कॅपिंग करणे या साठी सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकात CE19A116 या बजेट हेडवर विशेष निधी म्हणून र.रू.५ कोटी तरतूद असून त्या उपलब्ध रक्कमेपर्यंत काम करून घेणेत यावे.

**विषय क्र. १८४२ त्वर्य**

मा.सौ.संगिता देशपांडे व मा.सौ.दिपाली ओसवाल यांचे दि.६/१२/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र. ३३ ब येथील बाळासाहेब ठाकरे उद्यानामध्ये विविध विकासाची कामे करणेसाठी र.रुपये २ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक, सिग्नल सिंक्रनायझींग करणे | २ कोटी | --- |
| <u>नविन सुचविलेले काम</u><br>प्रभाग क्र. ३३ ब येथील बाळासाहेब ठाकरे उद्यानामध्ये विविध विकासाची कामे करणे | --- | २ कोटी |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १८४३ त्वर्य**

मा.सौ.दिपाली ओसवाल व मा.सौ.मुक्ता टिळक यांचे दि.६/१२/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र. ७२ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक,<br>१)बजेट कोड नं.झेडई१६अे१०४/एसपी२-३२३, प्रभाग क्र.७२ ब मध्ये सुपर इंदिरा नगर येथे पाण्याची लाईन टाकणे | २५ लाख | ------- |
| २)बजेट कोड नं.झेडई१६अे१०४/एसपी२-३२४,<br>प्रभाग क्र.७२ ब मध्ये इंदिरा नगर येथे पाण्याची लाईन टाकणे | २५ लाख | ------- |
| <u>नविन सुचविलेली कामे</u> | | |
| १) प्रभाग क्र. ७२ ब मध्ये विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण करणे | ------- | १० लाख |
| २) प्रभाग क्र. ७२ ब मध्ये शिवतेज नगर येथे कॉंक्रीटीकरण करणे | ------- | १० लाख |
| ३) प्रभाग क्र. ७२ ब मध्ये शेळके वस्ती, शिवतेज नगर कॉंक्रीटीकरण करणे | ------- | १० लाख |

| | | |
|---|---|---|
| ४) प्रभाग क्र. ७२ ब मध्ये अप्पर इंदिरानगर येथे कॉंक्रीटीकरण करणे | ------- | १० लाख |
| ५) प्रभाग क्र. ७२ ब मध्ये अप्पर सुपर इंदिरानगर स.नं. २७६ येथे समाज मंदिर बांधणे व ओटा मार्केट बांधणे | ------- | १० लाख |

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

**विषय क्र. १८४४ त्वर्य**

मा.फारुक इनामदार व सौ.सुनिता गलांडे यांचे दि.६/१२/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र. ७३ व प्रभाग क्र. ४५ अ मध्ये खालील विविध विकासाची कामे करणेसाठी र.रू. १ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक, एफई१७ए२७७/एस.वाय.१-३०, यादी क्र. एस.वाय.१, पान क्र. २५६, मुद्रणमहर्षि मामाराव दाते मुद्रणालय येथे अत्याधुनिक छपाई मशिनरी खरेदी करणे | १ कोटी | --- |
| नविन सुचविलेली कामे<br>१)प्रभाग क्र. ७३ मध्ये नव्याने बांधण्यात येणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये विद्युत विषयक कामे करणे<br>२) प्रभाग क्र. ७३ मध्ये नव्याने बांधण्यात येणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्रात सोनोग्राफी मशीन व तद्नुषंगिक कामे करणे<br>३) प्रभाग क्र. ४५ अ उद्यान विकसित करणे | <br>---<br><br>---<br>--- | <br>४० लाख<br><br>४० लाख<br>२० लाख |

**विषय क्र. १८४५ त्वर्य**

मा.सौ.अस्मिता शिंदे यांचे दि.६/१२/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र. ७० ब मध्ये खालील विविध विकासाची कामे करणेसाठी र.रू. १ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक, नविन सिग्नल बसविणे व जुने सिग्नल दुरुस्ती करणे **(यादी एसटी३),** पान क्र. १९८, अ.क्र.१, पुणे शहरातील वाहतुक शिस्तीसाठी ट्रॅफिक चॅनेलायझिंग, झेब्रा क्रॉसिंग, डिव्हायडर, सिग्नल सिंक्रोनायझेशन इत्यादी तदनुषंगिक कामे करणे | १ कोटी | --- |
| नविन सुचविलेली कामे | | |
| १)प्रभाग क्र. ७० ब मध्ये लोअर इंदिरानगर येथे विविध ठिकाणी रस्ते कॉंक्रीट करणे | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र. ७० ब मध्ये लोअर इंदिरानगर येथील अंतर्गत गल्ल्या कॉंक्रीट करणे | --- | १० लाख |
| ३) प्रभाग क्र. ७० ब मध्ये शिवशंकर सोसायटी येथे विविध ठिकाणी रस्ते कॉंक्रीट करणे | --- | १० लाख |
| ४) प्रभाग क्र. ७० ब मध्ये कुंभारवस्ती येथे विविध ठिकाणी रस्ते कॉंक्रीट करणे | --- | १० लाख |
| ५) प्रभाग क्र. ७० ब मध्ये पापळवस्ती येथे विविध ठिकाणी रस्ते कॉंक्रीट करणे | --- | १० लाख |
| ६) प्रभाग क्र. ७० ब मध्ये बिबवेवाडी गावठाण येथे विविध ठिकाणी रस्ते कॉंक्रीट करणे | --- | १० लाख |
| ७) प्रभाग क्र. ७० ब मध्ये बकुळनगर येथे विविध ठिकाणी रस्ते कॉंक्रीट करणे | --- | १० लाख |
| ८) प्रभाग क्र. ७० ब मध्ये प्रसाद बिबवेनगर येथे विविध ठिकाणी रस्ते कॉंक्रीट करणे | --- | १० लाख |
| ९) प्रभाग क्र. ७० ब मध्ये समर्थनगर येथे विविध ठिकाणी रस्ते कॉंक्रीट करणे | --- | १० लाख |
| १०) प्रभाग क्र. ७० ब मध्ये विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १८४६ त्वर्य**

मा.सौ.सुनंदा गडाळे व मा.सौ.अस्मिता शिंदे यांचे दि.६/१२/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र.४९अ मधील डॉ.कोटनिस दवाखाना व रविवार पेठ मनपा दवाखाना याठिकाणी विविध विकासाची कामांसाठी २० लाख रुपयांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे .

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६–१७ चे अंदाजपत्रक, यादी क्र.एस जे ६, शहरामध्ये नव्याने प्रसुती गृह /विविध सोयी सुविधा असलेले दवाखाने बांधणे, पान क्र.२२२ , अ.क्र.८, प्रभाग क्र.४९अ मध्ये गाडीखाना येथे डायलेसिस सेंटर चालू करणे. | २० लाख | --- |
| **<u>नवीन सुचविलेले काम –</u>**<br>प्रभाग क्र.४९अ मधील डॉ.कोटनिस दवाखाना व रविवार पेठ मनपा दवाखाना याठिकाणी विविध विकासाची कामे करणे. | --- | २० लाख |

**विषय क्र. १८४७ त्वर्य**

मा.सौ.सुनंदा गडाळे व मा.सौ.अस्मिता शिंदे यांचे दि.६/१२/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र.४९अ मध्ये विविध विकासाची कामे करणेसाठी र.रुपये २० लाखाचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे .

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६–१७ चे अंदाजपत्रक, मा.मुख्य सभा ठराव क्र.७३, दि.७/६/२०१६ अन्वये प्रभाग क्र.४९ अ मध्ये विविध विकासाची कामे करणे कामी मिळालेले वर्गीकरण, एकूण तरतूद र.रु.१ कोटी . | २० लाख | --- |
| **<u>नवीन सुचविलेले काम –</u>**<br>प्रभाग क्र.४९अ मध्ये विविध विकासाची कामे करणे. | --- | २० लाख |

**विषय क्र. १८४८ त्वर्य**

मा.अविनाश बागवे व मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे यांचे दि.६/१२/२०१६ चे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र.५५, दिनांक १२/४/२०१६ नुसार श्री.नागभुषण जोतेन्नवार यांचा मनपाच्या आर्किटेक्ट व इंटेरियर डिझायनर पॅनलमध्ये समावेश करण्यास मान्यता मिळालेली आहे. परंतू सदर ठरावामध्ये नजरचुकीने श्री.नागभुषण जोतेन्नवार ऐवजी श्री.नागभुषण जोतेंवार अशी ठरावामध्ये मान्यता मिळालेली आहे.

तरी स्थायी समिती ठराव क्र.५५, दिनांक १२/४/२०१६ ठरावामध्ये श्री.नागभुषण जोतेंवार ऐवजी श्री.नागभुषण जोतेन्नवर अशी दुरुस्तीस मान्यता देण्यात यावी.

**विषय क्र. १८४९ त्वर्य**

रिओ ऑलपिंक मध्ये नावलौकीक मिळविलेल्या साक्षी मलिक या भारतकन्येस ५ लाख रुपये व सन्मान चिन्ह देण्यास मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा. सौ. शितल सावंत अध्यक्षा, क्रिडा समिती, मा.विनायक हनमघर, मा.सौ.अस्मिता शिंदे व मा.श्रीमती स्मिता वस्ते यांचे दि.५/१०/२०१६ चे पत्रावर झालेला क्रिडा समिती ठराव क्र. ४० दि. ५/१०/२०१६ विचारासाठी.

**विषय क्र. १८५० त्वर्य**

कात्रज परिवहन महामंडळाच्या डेपो मध्ये काँक्रीटकरण, सिमाभिंत बांधणे व इतर तदनुषंगिक कामे करणे (शॉर्ट टेंडर) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.तेजस डेव्हलपर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २,२८,४८,३४३/– पेक्षा २२.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. १,७५,९५,५०८=९४ अधिक भाववाढ सुत्रानुसार आणि विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत करुन होणाऱ्या कमी/अधिक रक्कमेपर्यंत काम करुन घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/भवन/८४६ दि.६/१२/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. १८५१ त्वर्य**

प्रभाग क्र. ६५ ब घोरपडे पेठ मोमीनपुरा येथील दफनभुमीत सुधारणा कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आयुष एन्टरप्रायजेस यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४४,९९,२५४/– पेक्षा १४.९९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३८,२४,३७०=३९ अधिक भाववाढ सुत्रानुसार आणि विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत होऊन टेंडर अटी शर्तीनुसार काम करुन घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/भवन/८४७ दि.६/१२/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. १८५२ त्वर्य**

पुणे शहरातील वाहतुकीचे नियमन विषयक कामकाजाचे नियंत्रण व जनजागृती करणेकामी २ नग जीप हे वाहन खरेदी करणेकामी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मोवावि/८४८ दि.६/१२/२०१६ चे पत्र.

१. पुणे महानगरपालिकेच्या महापौर विकास निधीतून पुणे शहरातील वाहतुकीचे नियमन विषयक कामकाजाचे नियंत्रण व जनजागृती करणेकामी २ नग जीप हे वाहन खरेदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण ५ संविदामधील (२)(२) नियमाने मे. महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लिमीटेड, पुणे या उत्पादक कंपनीकडून डीजीएस ॲण्ड डी या दराने बोलेरो एसएलई २ डब्ल्युडी बीएस ४ एसी या मॉडेलचे जीप वाहन प्रति नग रक्कम रु. ६,५०,८०५/- या दराने २ नग जीप हे वाहन रक्कम रु. १३,०१,६१०/- या रक्कमेपर्यत त्यांचे दरापत्रकातील अटी व शर्ती स्विकारुन त्यांच्या बरोबर करारनामा न करता व अनामत रक्कम न घेता खरेदी करणेस --

२. पुणे महानगरपालिकेच्या महापौर विकास निधीतून पुणे शहरातील वाहतुकीचे नियमन विषयक कामकाजाचे नियंत्रण व जनजागृती करणेकामी २ नग जीप हे वाहन त्यांचे शासकीय कामकाजासाठी वाहन खरेदी सन २०१६-१७ चे महापौर विकास निधी या अंदाजपत्रकीय तरतूदीमधून खरेदी करणेस --

३. सदरची खरेदीबाबत कंपनीच्या अटी व शर्ती क्र.३ नुसार दरामध्ये बदल झाल्यास / डीजीएस ॲण्ड डी या दराचे मूळ किंमत, सरकारी दर इ. मध्ये बदल झाल्यास होणाऱ्या वाढीव दराने देय रक्कम आदा करावी लागणार असल्याने सदरची खरेदीकामी वाढीव देय रक्कम आदा करावयाची झाल्यास वाढीव देय रक्कम आदा करणेस--

(टिप - सदरची खरेदी रक्कम रु. ३०००/- पेक्षा जास्त असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण ५ (२)(२) नुसार प्रत्यक्ष उत्पादक कंपनीकडून खरेदी करण्यात येणार आहेत.)

**विषय क्र. १८५३ त्वर्य**

प्रभाग क्र. ३८ येथील घरांक ८२५ रविवार पेठ येथील अभ्यासिका/हॉल अव्यावसायिक/समाज उपयोगी संस्थांना ५ वर्षे कालावधीसाठी देखरेखीसाठी व वापरासाठी करारावर देणे करीता अर्ज मागविले असता एकूण २ अर्ज प्राप्त झाले असून श्री.शिवराय खानदेश मराठा मंडळ, पुणे ही संस्था प्रभागात नसल्यामुळे नियमावलीनुसार अपात्र होत असल्याने हिंदमाता प्रतिष्ठान प्रभाग क्र. ३८ या प्रभागात कार्यरत असल्याने नियमावलीनुसार पात्र होत असल्याने तसेच हिंदमाता प्रतिष्ठान राबवत असलेले उपक्रम लक्षात घेऊन सदर अभ्यासिका/हॉल विनामोबदला समाजउपयोगी उद्दीष्टांसाठी अव्यवसायिक तत्वावर हिंदमाता प्रतिष्ठान यांच्या ताब्यात मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून ५ वर्षे देणेस व संस्थेशी करारनामा करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उआप-३/ ८४९ दि.६/१२/२०१६ चे पत्र.

सुनिल पारखी
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**